MHBU110010732024

**किरकोळ अर्ज क्र. ३३/२०२४**
**सुनिताबाई उत्तम इंगळे -वि- सुनिल रामनाथ तांदळे**
**निशाणी क्र.१५ खाली**

---

**<u>शपथेवर उलटतपास पुढे सुरु - गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. आर. व्ही. पाटील.</u>**

०१. मलकापूर येथील न्यायालयामधील प्रकरणांकरीता मी माझे वकील म्हणून एन. बी. धूत यांची नेमणूक केली होती. गैरअर्जदाराच्या बाजूने प्रकरणाचानिकाल लागल्यानंतर त्याने सदर प्रकरणाची दरखास्त न्यायालयामध्ये दाखल केली आहे. सदर दरखास्तीमध्ये मी धूत वकिलांमर्फत १९/०१/२०२४ रोजी न्यायालयात हजर झाले. गैरअर्जदाराच्या हक्कामधे निकाल झाल्यानंतर त्याची माहीती मला १० ते १५ दिवसानंतर झाली. त्यानंतर मी सदर प्रकरणातील निकालपत्राच्या व हुकूमनाम्याच्या सत्यप्रती काढल्या सदर नकला मी तीन वेळेस काढल्या. पहिल्यांदा सत्यप्रती काढल्यानंतर मी सदर नकला ॲड. धूत यांना अपिल करण्याकरीता दिल्या नाही. मी त्या प्रती मुंबई येथील वकिलांना दिल्या होत्या परंतू त्याचे नांव मला सांगता येत नाही. त्यावेळी मला निकालाची अपील मलकापूर येथील न्यायालयामध्येच करावी लागेल याची माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, मुंबईच्या वकिलांना कागदपत्रे दिल्याचे मी खोटे सांगते.

०२. दिनांक १८/०६/२०२४ रोजी बुलढाणा जिल्हा न्यायालयात मला अपिलाची कागदपत्रे परत केली हे दाखविणारे कागदपत्र मी या प्रकरणांत दाखल केले किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जामध्ये

व शपथपत्रामध्ये आजारीपणाचे कथन खोटे केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे प्रकरण दाखल केले व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

मलकापूर.

दिनांक - १४/११/२०२५

Digitally signed by
RAJENDRAKUMAR
BABASAHEB GIRI
Date: 2025.11.14
17:40:44 +0530

**(आर. बी. गिरी)**

तदर्थ जिल्हा न्यायालय -१, मलकापूर

**CERTIFICATE**

I certify that this order P. D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Shri. V. S. Jadhav. (Junior Clerk) |
| Date of order | : | 14-11-2025 |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 14-11-2025 |
| Date of Uploading | : | 14-11-2025 |